



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : २२० वा गुरूवार दि २३ ऑक्टोबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# महाराष्ट्रात टाळलं, ते बिहारमध्ये घडलं; महागठबंधनकडून मोठी घोषणा सीएम पदाचा चेहरा ठरला...

**वृत्तसंस्था/ पाटणा**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत महागठबंधननं आज संयुक्त पत्रकार परिषद घेतली आहे. जागावाटपावरुन महागठबंधनमध्ये मतभेद असताना त्यांची एक संयुक्त पत्रकार परिषद झाली. यामध्ये तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आलं. काँग्रेसचे वरिष्ठ नेते अशोक गहलोत यांनी ही घोषणा केली. राजस्थानचे मुख्यमंत्री राहिलेले अशोक गहलोत जादूगार नावानं ओळखले जातात. आता त्यांनी केलेली घोषणा महागठबंधनसाठी जादू करणार का, याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे. वर्षभरापूर्वी महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक झाली. त्यावेळी विरोधकांच्या महाविकास आघाडीनं मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करणं टाळलं होतं. पण बिहारमध्ये तसं घडलेलं नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रिपदाचे चेहरे महागठबंधनकडून जाहीर करण्यात आले आहेत. महागठबंधनची सत्ता आल्यास तेजस्वी यादव मुख्यमंत्री, तर मुकेश सहनी उपमुख्यमंत्री होतील, अशी घोषणा काँग्रेसचे वरिष्ठ नेते अशोक गहलोत यांनी केली. सगळ्यांची मतं विचारात घेऊन, सर्वांना विश्वासात घेऊन आम्ही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रिपदाबद्दलचा निर्णय घेतला असल्याचं गहलोत यांनी सांगितलं. मुकेश सहनी हे मल्लाह समाजातून येतात. बॉलिवूडमधून परतलेले सन ऑफ मल्लाह यांनी गेल्या काही वर्षांत बिहारच्या राजकारणात जम बसवला आहे. बिहारमध्ये मल्लाह समाजाची लोकसंख्या २.६ टक्के आहे. महागठबंधनची संयुक्त पत्रकार परिषद आज संपन्न झाली. त्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रिपदाचे उमेदवार जाहीर करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी महागठबंधनमधील सगळ्या नेत्यांचे आभार मानले. सगळ्या सहकारी पक्षांनी माझ्यावर विश्वास दाखवला. सगळ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. सत्ताधारी एनडीएला केवळ सत्तेची भूक आहे. आम्हाला जनतेनं आशीर्वाद द्यावा. एनडीएनं ३० वर्षांत जे केलं नाही, ते आम्ही केवळ ३० महिन्यांत करुन दाखवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महागठबंधनमधील नेते, कार्यकर्ते केवळ सरकार स्थापन करण्यासाठी सोबत आलेले नाहीत. आम्ही बिहार घडवण्यासाठी सोबत आलो आहोत, असं तेजस्वी यादव म्हणाले. एनडीए नितीश कुमार यांच्यावर अन्याय करत असल्याची टीका त्यांनी केली. एनडीएच्या प्रचारात नितीश कुमार यांच्या चेहऱ्याचा वापर का केला जात नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. नितीश यांच्या नावाची मुख्यमंत्रिपदासाठी घोषणा करण्यात आलेली नाही. हा त्यांच्यावरील अन्यायच असल्याचं तेजस्वी यादव म्हणाले.



# तुमच्यासारखी खंबीर ताई मिळायला भाग्य लागतं... भाऊबीजेसाठी लाडक्या बहिणीला ठाकरेंचा आवर्जून फोन, शुभेच्छा देत म्हणाले...

**वृत्तसंस्था/मुंबई**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पुनर्मीलनानंतर ही पहिलीच दिवाळी . ठाकरे भावंडं भाऊबीजेचा सोहळा एकत्रित साजरा करण्याची चिन्हं आहेत. राज ठाकरे यांच्या सख्ख्या भगिनी जयजयवंती ठाकरे देशपांडे याही उद्धव दादूना ओवाळतील. मात्र याही पलिकडे उद्धव ठाकरे यांचं एका बहिणीशी नातं जोडलं आहे. ही बहीण गेल्या दोन-तीन वर्षांतच मनाने जवळ आलेली. त्या म्हणजे ठाकरे गटाची मुलुखमैदानी तोफ आणि उपनेत्या सुषमा अंधारे . भाऊबीजेच्या निमित्ताने सुषमा अंधारे गावी गेल्या आहेत, मात्र तरीही उद्धव ठाकरेंनी मायेचा धागा तुटू दिला नाही. सकाळीच उद्धव ठाकरे यांनी फोन करुन शुभेच्छा दिल्याचं सुषमा अंधारे यांनी फेसबुक पोस्ट लिहून शेअर केलं आहे. उद्धव ठाकरेंसोबत झालेल्या फोन लॉगचा स्क्रीनशॉटही अंधारेंनी पोस्ट केला आहे. ङ्गङ्गआज भाऊबीज .. अर्थात मी गावी परळीत आहे. खटल्याचं घर आहे. त्यामुळे सगळे भाऊ बहीण आम्ही एकत्र असतो. त्यात सख्खे, सावत्र, चुलत मावस मानलेले हा काही प्रकार नाही.. कुटुंब आहे. सगळे कुटुंबाचा भाग आहेत. पण गावी असल्याने मुंबईत पोचता आलं नाही... पण आपण पोचू शकलो नाही तरी तंत्रज्ञान आहे की मदतीला. असं सुषमा अंधारे लिहितात. ङ्गङ्गसकाळी पक्षप्रमुख उद्धव साहेबांचा फोन आला. वाटलं काही महत्वाची पक्षाची भूमिका मांडण्यासंदर्भात असेल. हॅलो म्हणण्या आधीच, ताई भाऊबीजेच्या शुभेच्छा. एवढी खंबीर बहीण मिळायला भाग्य लागतं.. तुमच्यासारखी लढाऊ बहीण सगळ्यांना लाभो... यावर आपण काय बोलावं... मी नुसतेच आभार मानले.. असं सुषमा अंधारेंनी लिहिलं आहे. काय गिफ्ट द्यायचं तुम्हाला.. सरांचं वाक्य मध्येच तोडत म्हटलं, भरभरून आशीर्वाद द्या सर फक्त... पण मनात वाक्य पुटपुटत होते, भाग्य तर आमचं महाराष्ट्राच्या कुटुंबप्रमुखांनी एका साधारण गावखेड्यातील मध्यमवर्गीय बहिणीला इतक्या आवर्जून फोन करून शुभेच्छा द्यावा... इडा पिडा जाऊदे... भावाचं राज्य येऊ दे... भाऊ माझा सुखी राहू दे... त्याचा वंशवेलु गगनाला भिडू दे अशा प्रार्थना केल्याचं सुषमा अंधारेंनी लिहिलं आहे.



# ...संचालकांबाबतची संदिग्धता...

## संपादकीय लेख

बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करीत नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा कालावधी सलग १० वर्षे करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने २९ जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे संबंधित सुधारणा दिनांक १ ऑगस्ट २०२५पासून अंमलात येणार असल्याचे जाहीर केले. या परिपत्रकाने या संदर्भातील संभ्रम अधिकच वाढवला आहे. कारण १० वर्षांचा कालावधी कधीपासून मोजायचा याबाबत स्पष्टता नाही. कायद्यातील हा बदल एक ऑगस्ट २०२५पासून लागू झाला आहे. याचाच अर्थ या दिवशी एखाद्या विशिष्ट संचालकास संचालकपदी राहून सलग १० वर्षे पूर्ण झाली असतील तर एक ऑगस्ट २०२५नंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तो अपात्र ठरण्याची शक्यता आहे. कायद्याच्या तरतुदीत सलग १० वर्षे म्हणजेच कोणताही खंड न घेता १० वर्षांचा कालावधी, असा उल्लेख आहे. जर एखाद्या व्यक्तीने नऊ वर्षे झाल्यानंतर राजीनामा दिला, तर तो पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल. असे झाल्यास कायद्यामधील या सुधारणेचा हेतूच विफल होईल. एखादी व्यक्ती सलग १० वर्षे संचालक राहिल्यानंतर पाच वर्षांच्या खंडानंतर पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल का, या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. कारण सलग १० वर्षे संचालकपदी राहिलेली व्यक्ती त्यानंतर संचालक होण्यास कधीच पात्र ठरणार नाही, असे कायदा सांगतो. याचा अर्थ एखादा संचालक सलग १० वर्षे संचालक राहिल्यास तो नंतर कायमस्वरूपी अपात्र ठरण्याची शक्यता आहे. बँकिंग नियमन कायद्यातील ही तरतूद बँकेच्या अध्यक्षांना व पूर्ण वेळ संचालकांना लागू केलेली नाही. १० वर्षांचा कालावधी मोजताना त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ मोजायचा नाही का? अथवा अध्यक्ष असलेल्या व्यक्तीस ही तरतूद लागू होणार की नाही? ङ्गपूर्ण वेळ संचालकफ ही संकल्पना व्यापारी बँकिंग क्षेत्रातील आहे. तेथे अध्यक्ष अथवा पूर्ण वेळ संचालक हे पगारी असतात. सबब व्यापारी बँकांसाठी करण्यात आलेली ही तरतूद नागरी सहकारी बँकांना लागू करताना त्यामध्ये सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीनुसार बदल करणे अपेक्षित होते. महाराष्ट्र सरकारने सन १९६९मध्ये राज्याच्या सहकार कायद्यात सुधारणा करून कोणत्याही संचालकास सलग सहा वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष पदावर राहता येणार नाही, अशी तरतूद केली. सन १९८३मध्ये त्यात सुधारणा करून सहा वर्षांचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. परंतु ङ्गसलगफ या शब्दावर कायदेशीर कीस पाडत अनेक जण १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पाच-सहा महिने अगोदर राजीनामा देऊन पुन्हा निवडून, पुन्हा पुढील १० वर्षांची पात्रता धारण करण्याची शक्यता होती. अथवा तशी उदाहरणे घडल्याने राज्य सरकारने १९८६मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत ङ्गसलगफ शब्दाऐवजी ङ्गएकूणफ असा बदल केला. त्यामुळे तुकड्या-तुकड्यांचा कालावधी देखील मोजण्यात येऊ लागला. कायद्यातील पळवाट बंद झाल्याने अनेकांची निराशा झाली आणि सगळ्यांनी एकत्र येऊन २००७मध्ये सहकार कायद्यातून ही १० वर्षांची तरतूदच वगळली! केंद्र सरकारने संबंधित कायद्यात दुरुस्ती करताना महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्याचा अनुभव विचारात घेणे आवश्यक होते, असे गमतीने म्हणावेसे वाटते. कारण सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी १९६९मध्ये दहा वर्षांच्या कार्यकाळाबाबत कलम ७३-अ मध्ये दुरुस्ती करताना सहकार खात्याने अनेक शक्यतांचा विचार करून, कायदा वाचताना कोठेही शंकेला वाव मिळणार नाही, याची खबरदारी घेतली होती. १) कलम ७३-अ नंतर खाली दिलेल्या खुलाशात १० वर्षांची मुदत मोजताना सदर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीचा कालावधी विचारात घ्यावयाचा नाही, असे स्पष्ट नमूद केले होते. २) कायद्यातील पळवाट शोधून सरकारच्या हेतूला हरताळ फासला जाऊ नये, म्हणून याच कलम ७३-अ च्या खाली खुलासा क्र.२ मध्ये असे नमूद केले होते की, १० वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी मागील १२ महिन्यांत पदाधिकाऱ्याने राजीनामा दिल्यास, त्याने १० वर्षांचा कालावधी पूर्ण केला, असे मानण्यात येईल. ३) याच कलमानंतर खुलाशामध्ये असेही स्पष्ट करण्यात आले होते, की अशा व्यक्तीस १० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्या समितीचा एक कालावधी (सध्या पाच वर्षे) संपेपर्यंत पुन्हा निवडणुकीस उभे राहता येणार नाही. म्हणजे पाच वर्षांच्या खंडानंतर ती व्यक्ती पुन्हा पुढील दहा वर्षांच्या कालावधीसाठी संचालक होऊ शकत होती. बँकिंग नियमन कायद्यामधील नवीन तरतुदींनुसार मात्र संबंधित व्यक्तीने संचालक म्हणून सलग १० वर्षांचा कालावधी एकदा जरी पूर्ण केला तरी त्यास त्या संस्थेवर आयुष्यभरात पुन्हा कधीही संचालक होता येणार नाही. बँकिंग नियमन कायद्यातील नवीन दुरुस्ती वाचताना, त्यामध्ये ङ्गसलग १० वर्षेफ हा उल्लेख केल्याने एक ऑगस्ट २०२५ नंतर होणाऱ्या निवडणुकींद्वारे प्रथम निवडून येणारे संचालक १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच राजीनामा देतील व थोड्या कालावधीनंतर निवडणुकीद्वारे पुनश्च निवडून येतील व तहहयात संचालक राहू शकतील. परंतु संबंधित कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी, सलग दहा वर्षांचा कालावधी पूर्ण करणाऱ्या संचालकांना एक ऑगस्ट २०२५ नंतर नवीन तरतुदींनुसार त्या संस्थेचे कधीच पदाधिकारी होता येणार नाही. राज्यस्तरीय नागरी सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर त्या त्या राज्यांत स्थापन झालेल्या निवडणूक प्राधिकरण ंचे नियंत्रण असते. या पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँकेच्या कायद्यातील तरतुदींच्या आधारे स्वत:च्या कायद्यात बदल न करता, निवडणूक प्राधिकरण एखाद्या उमेदवारास अपात्र ठरविण्याचे धाडस करेल? कारण २०२१ नंतर झालेल्या निवडणुकांसाठी बँकिंग नियमन कायद्यात त्या वेळी आठ वर्षांची तरतूद असतानाही राज्य निवडणूक प्राधिकरणाने एकाही उमेदवारास अपात्र ठरविलेले नाही.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आम्ही बाप बदलत नाही, माझा राजकीय बाप शरद पवारच' म्हणणारा बडा नेता विखेंच्या भेटीला

## तुतारी सोडून कमळ धरणार?

**अहिल्यानगर :** आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष अमित भांगरे यांनी बुधवारी जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची शिर्डी येथील शासकीय विश्रामगृह येथे भेट घेतल्यामुळे राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.विशेष म्हणजे, भांगरे यांनी आपल्या आई, सुनीता भांगरे यांच्यासह विखे-पाटलांशी बंद दाराआड चर्चा केल्याने त्यांच्या संभाव्य राजकीय भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. बंद दाराआड नेमके काय शिजले? याची जोरदार चर्चा होत आहे. या बैठकीला भाजपचे माजी आमदार वैभव पिचड यांचीही उपस्थिती होती. गेल्या पंधरा दिवसांतील भांगरे आणि विखे-पाटील यांच्यातील ही दुसरी भेट असल्याने राजकीय तर्क-वितर्कांना आणखीनच जोर आला आहे.अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे आगामी अध्यक्षपद अनुसूचित जमातीच्या महिलेसाठी राखीव झाले आहे. याच पार्श्वभूमीवर भांगरे यांची ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. अमित भांगरे यांच्या आई, सुनीता भांगरे या अकोले तालुक्यातून जिल्हा परिषद निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. अध्यक्षपदाचे आरक्षण आणि सुनीता भांगरे यांची निवडणूक लढवण्याची तयारी पाहता, त्यांना भाजपच्या माध्यमातून संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.या भेटीमुळे, ऐन निवडणुकीच्या तोंडावर अमित भांगरे हे शरद पवारांची साथ सोडणार का? अशी चर्चा रंगू लागली आहे. भांगरे लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची दाट शक्यता राजकीय गोटात व्यक्त होत आहे.अमित भांगरे यांनी यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून मागील वर्षी विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यांनी अनेक जाहीर सभांमध्ये 'आम्ही बाप बदलत नाही, माझा राजकीय बाप शरद पवारच' असे ठामपणे सांगितले होते. मात्र, आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे त्यांच्या भूमिकेत बदल होण्याची शक्यता आहे.विखे-पाटलांशी झालेल्या



या महत्त्वपूर्ण भेटीनंतर भांगरे आता नेमका कोणता निर्णय घेतात, याकडे अहिल्यानगर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे. त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चेमुळे शरद पवारांच्या 'राष्ट्रवादी'ला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

## थोरात यांचा नवा बॉम्ब, महाराष्ट्राचं राजकारण तापणार? काय म्हणाले?

**अहिल्यानगर :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात हे पक्षातील सर्वात सिनियर नेत्यांपैकी एक नेते आहेत. काँग्रेसमध्ये त्यांच्या भूमिकेला महत्त्व आहे. त्यांच्या मार्गदर्शनाला महत्त्व आहे. महाराष्ट्र काँग्रेसमधील ते बडे प्रस्थ आहेत. त्याशिवाय बाळासाहेब थोरात यांचे सर्वपक्षीय नेत्यांसोबत चांगले संबंध आहेत. एक दिग्गज राजकारणी म्हणून त्यांची छवी आहे. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याला महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाचं मानलं जातं. बाळासाहेब थोरात यांनी अनेक वर्ष संगमनेरचं प्रतिनिधित्व केलं. ते सलग आठ वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. पण नुकत्याच काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत बाळासाहेब थोरात यांचा पराभव झाला.

बाळासाहेब थोरात यांचा पराभव होईल, असं कुणाला वाटलं नव्हतं. ते दिग्गज नेते आहेत. शिवाय त्यांचं मतदारसंघात काम आहे. मतदारसंघातील नागरिकांसोबत त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. तरीही या निवडणुकीत बाळासाहेब



थोरात यांचा पराभव झाला. थोरात यांचा पराभव होण्यामागे काही वेगळी कारणे असू शकतात. पण विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या निकालावर शंका उपस्थित केली आहे.स्वत: बाळासाहेब थोरात यांनी यावेळी संगमनेरमध्ये ९५०० बोगस मतदारांची नोंद असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. अनेक जण दुबार आणि काही स्थानिक नसणाऱ्यांची नावे यादीत आहेत. निवडणूक आयोग बनवाबनवी करत आहे का? अशी शंका येत असल्याचं बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे. संगमनेर मतदारसंघात साडेनऊ हजार दोष आम्ही दाखवून दिले. हे नावे दुबार आहेत, हे नाव चुकीचे आहेत.

## राज्य सरकारकडून निधीवाटपात दुजाभाव?

**नागपूर :** 'राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी सध्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. केंद्र सरकारने ठरवलेल्या निकषांमुळे आणि राज्य सरकारकडून खरेदीसाठी मंजुरी न मिळाल्याने शेतकऱ्यांना कापसाला योग्य दर मिळत नाही. अशा परिस्थितीत सत्ताधारी आमदारांना कोट्यवधींचा निधी दिला जात आहे. मात्र शेतकऱ्यांसाठी सरकारकडे पैसा नाही का?', असा संतप्त सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर तीव्र टीका केली. ङ्गमहायुती सरकारमधील पहिल्यांदाच निवडून आलेल्या सुमारे ५० आमदारांना प्रत्येकी ५ कोटी रुपयांचा आमदार निधी देण्यात आला आहे. एकीकडे राज्यातील आदिवासी विकास विभाग आणि मागासवर्गीय कल्याण विभागाचा निधी वळवला जात आहे, राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत आहे, आणि दुसरीकडे सत्ताधारी आमदारांवर निधीची खैरात केली जात आहे. हे केवळ विरोधकांवर अन्याय नसून जनतेवरही अन्याय आहे, असे वडेट्टीवार म्हणाले.

## महायुती सरकारचा मोठा निर्णय, १५०० चा हप्ता तर मिळणारच आणि..

**मुंबई :** भाऊबीजेच्या तोंडावर महाराष्ट्रातील लाडकी बहिणींची नाराजी दूर करणारा मोठा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेला राज्य सरकारने तात्पुरती स्थगिती दिली आहे. विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजनेचा मोठा फायदा महायुतीला झाला होता. मात्र ई-केवायसी प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर लाडक्या बहिणी काहीशा खट्टू झाल्या होत्या. परंतु आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महिलावर्गाची नाराजी दूर सारण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे ऑक्टोबर महिन्याचा हप्ता लवकरच मिळण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. लाडकी बहीण योजना गेल्या वर्षी जुलै महिन्यात सुरु झाली. २८ जून २०२४ रोजी मंजुरी मिळाल्यानंतर जुलैपासून महिलांच्या खात्यात हप्ता जमा होण्यास सुरुवात झाली. ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात अर्ज करणाऱ्या लाडक्या बहिणींची संख्या २ कोटी ५६ लाखांवर पोहोचली होती. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात झालेल्या



विधानसभा निवडणुकीवेळी ही योजना महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरली होती.लाडकी बहीण योजनेत ऑगस्ट २०२५ पर्यंत १४ हप्त्यांचे वितरण पूर्ण झाले आहे. सप्टेंबरसाठी निधी उपलब्ध झाल्याने लवकरच प्रत्येक पात्र महिलेच्या बँक खात्यात १५०० रुपयांची रक्कम जमा होईल, असे अपेक्षित आहे. दरम्यान, सहा महिन्यांच्या कालावधीनंतर निकषांच्या पूर्ततेची कसून तपासणी सुरु झाली. लाभार्थ्यांच्या छाननीत चारचाकी वाहनधारक महिला, केंद्र आणि राज्य सरकारच्या अन्य योजनांचा लाभ घेणाऱ्या 'बहिणी', शासकीय सेवेतील कर्मचारी, तसेच एकाच कुटुंबातील अनेक लाभार्थी भगिनींना या योजनेतून वगळण्यात आलं होतं.

# मंत्र्यांच्या कामांचे ऑडिट होणार, मंत्रिमंडळात फेरबदल होणार?

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वाची माहिती समोर येत आहे. महायुती सरकारची वर्षपूर्ती झाल्यानंतर महत्त्वाच्या घडामोडी घडणार आहेत. महायुतीमधील सर्व मंत्र्यांच्या कामांचे ऑडिट होणार असल्याची चर्चा आहे. याबाबत एका वृत्तवाहिनीने सूत्रांच्या हवाल्याने वृत्त दिलं आहे. मंत्र्यांच्या कामांच्या ऑडिटमधून कोणत्या मंत्र्याने काय-काय कामे केली, याची माहिती घेतली जाणार आहे. असं असलं तरी गुजरातप्रमाणे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात बदल होणार नाही, अशी देखील माहिती समोर येत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांसोबत अनौपचारिक गप्पा मारत असताना याबाबतच्या वृत्तांचं खंडन केलं



आहे. मंत्र्यांच्या कामांचं ऑडिट होईल म्हणजे केवळ मंत्र्यांच्या कामाचा आढावा घेतला जाईल. तूर्तास तरी मंत्रिमंडळाच्या विस्ताराचा कोणताही विचार नाही. याउलट सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महत्त्वाच्या आहेत. त्यांच्याकडे आमचं लक्ष आहे. त्यामुळे विस्तार होईल किंवा सध्याच्या मंत्र्यांना हटवण्याबाबत कोणतीही परिस्थिती नाही. आमच्यासाठी सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे मंत्रिमंडळात फेरबदलाची कोणतीही शक्यता नाही, असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं आहे.दरम्यान, 'आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढणार', असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. पण 'पुणे, पिंपरीत भाजप स्वबळावर लढणार', असंही फडणवीस म्हणाले आहेत. तसेच 'ठाण्यात महायुती म्हणून एकत्र लढू शकतो का? याची चाचपणी होईल. विरोधकांना जिथे फायदा होईल तिथे महायुती म्हणून एकत्र लढू', असंही फडणवीस म्हणाले आहेत. दरम्यान, ठाण्यात एकत्र लढायचं की स्वबळावर लढायचं याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे निर्णय घेणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

दुसरीकडे महायुतीत अनेक ठिकाणी मतभेद पहायला मिळत आहेत. हे मतभेद पाहता आगामी निवडणुकीला महायुतीचे नेते कसे सामोरे जातात? ते पाहणं देखील महत्त्वाचे आहे. स्थानिक पातळीवर सुरु असलेले मतभेद हे टोकाला जाऊ नयेत, यासाठी महायुतीच्या घटक पक्षांचे ज्येष्ठ नेते काय-काय पावलं उचलतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




# शासकीय सेवेत असताना एकाच वेळी दोन नोकऱ्या, ४४ लाखांची फसवणूक

**वॉशिंग्टन :** एकाच वेळी दोन नोकऱ्या करत असल्याच्या आरोपाखाली अमेरिकेत भारतीय वंशाच्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. ३९ वर्षीय मेहुल गोस्वामी याच्यावर ५०००० डॉलर्सपेक्षा जास्त म्हणजे अंदाजे ४४ लाख रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याचा आरोप आहे. तो न्यूयॉर्क स्टेट ऑफिस ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी सर्व्हिसेससाठी काम करत असतानाच माल्टा शहरात दुसरी नोकरी करत होता. या प्रकरणी त्याला आता १५ वर्षांपर्यंत अजामीनपात्र तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

मेहुल गोस्वामीने मार्च २०२२ मध्ये माल्टा येथील ग्लोबल फाउंड्रीज या सेमिकंडक्टर फर्ममध्ये कंत्राटदार म्हणून दुसरी नोकरी सुरू केली होती. सॅराटोगा काउंटी शेरीफ कार्यालयानुसार, गोस्वामी न्यूयॉर्क प्रशासनासाठी काम करत असतानाच या खाजगी कंपनीतही नोकरी करत होता. न्यूयॉर्क स्टेट इन्स्पेक्टर जनरल लुसी लँग यांनी म्हटले आहे की, 'सार्वजनिक कर्मचाऱ्यांवर सचोटीने सेवा करण्याची जबाबदारी असते आणि मेहुल गोस्वामी याचे वर्तन त्या विश्वासाचा गंभीररित्या भंग केल्याचे दर्शवते.' लँग यांनी पुढे स्पष्ट केले की, 'शासनासाठी काम करत असल्याचा दावा करत असताना दुसरी पूर्णवेळ नोकरी करणे हे सार्वजनिक संसाधनांचा गैरवापर आहे, ज्यात टॅक्सपेयरच्या पैशांचाही समावेश आहे' गोस्वामीवर दुसऱ्या दर्जाच्या ग्रँड थेफ्टचा आरोप आहे. यासाठी त्याला जवळपास दहा वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. न्यूयॉर्कमध्ये या





गुन्ह्यासाठी कमाल १५ वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे. माल्टा टाउन कोर्टात मेहुल गोस्वामीला न्यायाधीश जेम्स ए. फॉसी यांच्यासमोर हजर करण्यात आले होते. त्यानंतर पुढील कार्यवाही होईपर्यंत त्याला स्वतःच्या जबाबदारीवर सोडण्यात आले. न्यूयॉर्क राज्याच्या कायद्यानुसार, जानेवारी २०२० पासून हा गुन्हा जामीन मिळण्यास पात्र नाही. लँग यांनी गोस्वामीच्या अटकेनंतर सांगितले की, 'न्यूयॉर्क राज्यातील सार्वजनिक सेवेची सचोटी धोक्यात आणणाऱ्या कोणालाही जबाबदार धरण्यासाठी माझे कार्यालय आणि कायदा अंमलबजावणी विभाग मिळून काम करत राहील.'

या प्रकरणात गोस्वामीने न्यूयॉर्क राज्याच्या माहिती तंत्रज्ञान सेवा कार्यालयातून पगार घेतला, तर त्याच वेळी तो ग्लोबल फाउंड्रीजसाठीही काम करत होता. या दोन्ही नोकऱ्यांमध्ये तो एकाच वेळी काम करत असल्याने, त्याने दोन्ही ठिकाणच्या कामाच्या वेळेचा गैरवापर केल्याचा आरोप आहे.

## हट्टी पत्नीला पतीचा नकार, तिने चिमुकल्याला घेतलं अनब..

**लखनऊ :** भाऊबीजेसाठी पतीने पत्नीला माहेरी जाण्यास नकार दिल्याने जोडप्यात जोरदार वाद झाला. त्यानंतर संतप्त झालेल्या पत्नीने तिच्या नऊ वर्षांच्या मुलासह विष प्राशन करून आपल्या आयुष्याची अखेर केली. उत्तर प्रदेशातील शाहजहांपूरमध्ये ही हृदयद्रावक घटना घडल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच, पोलीस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी पंचनामा करुन मृतदेह ताब्यात घेतले आणि शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. या घटनेने परिसरात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील बांदा पोलिस स्टेशन हद्दीतील नारायणपूर गंगा गावात ही भयंकर घटना घडली. गावातील रहिवासी पंकज कुमार हे त्यांची पत्नी आरती आणि नऊ वर्षांचा मुलगा प्रतीक यांच्यासोबत आनंदाने राहत होते. त्यांची १० वर्षांची भाची सुष्मिता देखील त्यांच्यासोबत राहत होती. या प्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, आरतीने भाऊबीजनिमित्त तिच्या आईवडिलांच्या घरी जाण्याचा आग्रह धरला होता. परंतु तिच्या पतीने त्यासाठी नकार दिला.यादरम्यान पंकजचा मुलगा प्रतीक आणि भाची सुष्मिता यांच्यात कुठल्या कारणावरुन भांडण झाले. पत्नीने हा मुद्दा धरुन माहेरी जाण्याचा हट्ट धरला. मात्र, पतीने त्यासाठी स्पष्ट नकार दिला. त्यानंतर संतापलेल्या पत्नीने प्रथम घरात साठवलेले सल्फा तिच्या ९ वर्षांच्या मुलाला पाजले आणि नंतर स्वतः ते प्राशन करून आपल्या आयुष्याची अखेर केली. पतीने विषारी पदार्थ प्राशन केल्याचे कळताच पंकजने पत्नी आणि मुलाला केंद्रीय आरोग्य केंद्रात नेले. मात्र, तोपर्यंत खूप उशीर झाला होता. तिथे डॉक्टरांनी तपासून दोघांनाही मृत घोषित केले.या घटनेची माहिती मिळताच, ग्रामीण पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी दोन्ही मृतदेह ताब्यात घेतले आणि शवविच्छेदनासाठी पाठवले.


## मैत्रिणीसोबत मोमोज खायला निघाली, रात्री रुग्णालयात मृत्यू

लखनऊ : एक अल्पवयीन मुलगी मैत्रिणीसोबत मोमोज खायला गेली, त्यानंतर घरच्यांना कळालं की तिला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मात्र, उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. तिच्यासोबत काय घडलं याबाबत सध्या काहीही अधिकृत माहिती नसली तरी तिच्या कुटुंबीयांनी मुलीवर अत्याचार होऊन तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप केला आहे. उत्तर प्रदेशात मुरादाबादच्या कटघर परिसरात ही घटना घडल्याची माहिती आहे. १४ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ६ वाजता त्याच परिसरातील एका तरुणीने तिच्या मुलीला मोमोज खायला नेण्याच्या बहाण्याने घराबाहेर नेले. रात्री ८:३० वाजता आम्हाला कळालं की मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही माहिती मिळताच आम्ही रुग्णालयात दाखल झालो.पोलिसांनी तपास केला असता या मुलीला तिच्या मित्राने आणि एका तरुणाने रुग्णालयात दाखल केल्याचं समोर आलं.

## बर्थडे पार्टीत राडा, बीअरची बाटली मित्राच्या डोक्यात घातली

**कोल्हापूर :** कोल्हापुरात किरकोळ कारणावरून वाढदिवसाची पार्टी हाणामारीच्या पार्टीत रूपांतरित झाल्याची घटना घडली आहे. शहरातील शिवाजी पेठेतील सरनाईक कॉलनी येथे मंगळवारी पहाटे वाढदिवस साजरा करताना क्षुल्लक कारणावरून सुरू झालेल्या वादातून पार्टीचे वातावरण अक्षरशः रणांगणात बदलून गेले. या मारामारीत एकाने दुसऱ्याच्या डोक्यात बीअरची बाटली फोडली, तर प्रत्युत्तरात त्याच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला. या घटनेत दोघे तरुण जखमी झाले असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आकाश संभाजी भोसले (वय ३४, रा. वेताळमाळ तालीम, शिवाजी पेठ) याचा वाढदिवस साजरा करण्यासाठी त्याच्या मित्रांनी सरनाईक कॉलनी परिसरात पार्टीचे आयोजन केले होते. त्याच्या मित्रांमध्ये अक्षय साळोखे आणि त्याचा भाऊ अजिंक्य साळोखे (रा. सरनाईक कॉलनी) उपस्थित होते. पहाटे तीनच्या सुमारास सर्वजण दारूच्या नशेत असताना किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला. वाद वाढताच अजिंक्यने बीअरची बाटली उचलून आकाशच्या डोक्यात फोडली. बाटलीचे तुकडे लागल्याने आकाश जखमी झाला.घटनेचा राग येऊन आकाशने आपल्या जवळील चाकू काढून अजिंक्यवर हल्ला केला. यात अजिंक्यच्या पोटाच्या भागाला खोलवर जखम झाली. या दोघांमधील भांडण सोडवताना अक्षयलाही किरकोळ इजा झाली. जखमींना त्वरीत सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.या घटनेची माहिती मिळताच जुना राजवाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. जुना राजवाडा पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद झाली आहे. आकाश भोसले याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून अजिंक्यच्या विरोधातही मारहाणीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## भाऊ गेल्याचं दुःख सहन होईना, एकत्र जन्म घेऊ म्हणत जीव दिला



**छतरपूर :** भावाच्या मृत्यूने दुःखी झालेल्या भावाने स्वतःवर गोळी झाडून आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. त्यापूर्वी त्याने एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केली. ज्यामध्ये तो म्हणाला, 'मी देवाशी लढणार आहे आणि आम्ही पुन्हा एकत्र जन्म घेऊ...'ही घटना मध्य प्रदेशातील छतरपूरच्या सिटी कोतवाली पोलिस स्टेशन परिसरातील राष्ट्रीय महामार्गावरील एचएम हॉटेलमध्ये घडल्याची माहिती आहे. येथे २५ वर्षीय राजेश मिश्राने स्वतःवर गोळी झाडून आपले आयुष्य संपवले आहे. त्याने थेट डोक्यात गोळी घातल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूपूर्वी त्याने एक व्हिडिओ देखील बनवला होता. व्हिडिओमध्ये तो म्हणाला, 'माझ्या भावाच्या मृत्यूमुळे मला खूप दुःख झाले आहे आणि मी देवाशी लढणार आहे, आम्ही पुन्हा जन्म घेऊ. तो तिथे एकटा आहे, मला त्याची खूप आठवण येत आहे'ही चित्रपटाची कथा वाटत असली तरी, ती चित्रपटाची कथा नाही; हे एक वास्तव आहे ज्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, तरुणाच्या आत्याच्या मुलाचा काहीच दिवसांपूर्वी रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे. आतेभावाच्या मृत्यूने हा तरुण खूप दुःखी होता. तो त्याच्यासाठी सख्ख्या भावासारखा होता.

त्याचा असा अचानक मृत्यू झाल्याने या तरुणाला मानसिक धक्का बसला होता. तो हे दुःख सहन करु शकत नव्हता. अखेर भावनांच्या भरात त्याने आपल्या आयुष्याची अखेर करण्याचा निर्णय घेतला. तो व्हिडिओमध्ये म्हणाला की, तो आपल्या भावाला घेऊन परत येईल आणि पुन्हा एकत्र जन्म घेतील. त्याच्या या व्हिडिओने कुटुंब आणि परिसरातील लोकांना हादरवून सोडलं आहे.घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिस ठाण्यातील पोलिस तात्काळ एचएम हॉटेलमध्ये पोहोचले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली, मृतदेह ताब्यात घेतला आणि तो पोस्टमॉर्टमसाठी पाठवला.

पोलिसांनी तरुणाचा व्हिडिओ देखील जप्त केला, ज्याच्या आधारे तपास सुरू करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की तरुणाने बेकायदेशीरपणे पिस्तूल मिळवले होते, ज्याचा वापर त्याने स्वतःचा जीव घेण्यासाठी केला होता. त्याने हे पाऊल का उचलले आणि त्याला पिस्तूल कुठून मिळाले याचाही पोलिस तपास करत आहेत.

# भारताला अजूनही मिळाली नाही ट्रॉफी

## आता बीसीसीआय काढणार नक्वीची हेकडी

**नवी दिल्ली :** आशिया कप २०२५ जिंकलेल्या भारतीय क्रिकेट संघाने ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी ट्रॉफी घेऊन निघून जाण्यामुळे भारतीय संघाला अद्याप ट्रॉफी मिळालेली नाही. नंतर ती ट्रॉफी एसीसीच्या कार्यालयात ठेवण्यात आली.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आता हा मुद्दा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) मांडण्याचा निर्णय घेतला आहे. दुबईत ४ ते ७ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या आयसीसी बोर्डाच्या बैठकीत बीसीसीआय संपूर्ण प्रकरण उपस्थित करणार आहे. एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, 'एसीसी अध्यक्ष अजूनही ठाम आहेत, त्यामुळे ट्रॉफी हस्तांतरणाबाबत त्यांचे उत्तर आम्ही स्वीकारणार नाही.' बीसीसीआयने मोहसिन नक्वी यांना अधिकृत ईमेल पाठवून ट्रॉफी लवकरात लवकर भारताला सोपवण्यास सांगितले, मात्र नक्वी यांनी हट्टीपणा कायम ठेवला आहे. एसीसी प्रमुख म्हणाले की, 'ट्रॉफी दुबई कार्यालयातून घेता येते; बीसीसीआयचा अधिकारी किंवा खेळाडू तिथे येऊन ट्रॉफी घ्यावी लागेल.'

आयसीसीच्या बैठकीत हा वाद कसा सुटतो हे आता पाहणे मनोरंजक ठरेल. ललळ-ींलोश्रिरळपीं-रसरळपीीं-परींीळ-ुळींह-ळलल तथापि, भारतीय संघाने सलग तीन सामन्यांत पाकिस्तानला पराभूत करून जिंकलेली ट्रॉफी न मिळणे पूर्णपणे अन्याय्य ठरत आहे. २०२५ च्या आशिया कपमध्ये भारतीय संघाने पहिले गट टप्प्यात पाकिस्तानला सात विकेट्सने हरवले, सुपर फोर सामन्यात सहा विकेट्सने विजय मिळवला, आणि अंतिम सामन्यात पाच विकेट्सने पाकिस्तानचा पराभव केला. जेतेपद मिळाल्यानंतर भारतीय संघ मैदानावर बराच वेळ प्रतीक्षेत राहिला. एमिरेट्स क्रिकेट बोर्डाचे (एउइ) उपाध्यक्ष ट्रॉफी सादर करण्यासाठी आले होते, परंतु मोहसिन नक्वी यांनी नकार दिला. या प्रकरणामुळे भारतीय संघ आणि बीसीसीआयच्या धैर्याची कसोटा आता आयसीसीच्या पुढील बैठकीत पाहायला मिळेल.





## चिनी वर्ल्ड चॅम्पियन जोडीला हरवत प्रथमच फायनलमध्ये एन्ट्री

**येओसू (कोरिया) :** थॉमस कप, आशियाई अजिंक्यपद अशा बॅडमिंटनमधील आव्हानात्मक स्पर्धा जिंकणाऱ्या सात्त्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या बॅडमिंटन दुहेरीतील जोडीने शनिवारी कोरिया ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. ४० मिनिटे रंगलेल्या उपांत्य फेरीत सात्त्विक-चिराग यांनी जागतिक रँकिंगमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या लियांग वी केंग-वँग चँग या चिनी जोडीचे आव्हान २१-१५, २४-२२ असे मोडून काढले.

जागतिक दुहेरीच्या रँकिंगमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सात्त्विक-चिरागने यंदा स्विस ओपन सुपर ३०० (मोसमाच्या पूर्वार्धात) आणि इंडोनेशियन ओपन सुपर १००० या स्पर्धा (गेल्या महिन्यात) जिंकल्या आहेत.पहिल्या गेममध्ये ७-७ अशा गुणांपर्यंत प्रतिस्पर्ध्यांत बरोबरी होती. नंतर मात्र सात्त्विक-चिरागने आघाडी घेत १४-८ असे वर्चस्व निर्माण केले. अनब पुढे हा गेम २१-१५ असा खिशात टाकत सामन्यात आघाडी घेतली. दुसऱ्या गेममध्येही सुरुवातीपासून चढाओढ दिसली. सात्त्विक-चिरागने १२-८ अशी आघाडीही घेतली. मात्र लियांग वी केंग-वँग चँग हे सहज हार




माणारे नव्हते. त्यांनी सात्त्विक-चिराग यांना १८-१८ असे गाठले. सामन्यातील रंगत वाढत असताना प्रतिस्पर्ध्यांकडून चुकाही झाल्या. सात्त्विक-चिराग यांनी आपल्याच सर्व्हिसवर दोनवेळा टाळता येण्याजोग्या चुका केल्या. मध्येच सर्व्हिसही तोकडी पडत होती. सात्त्विक-चिरागला तीन 'मॅच पॉइंट'ही लाभले, पण तेही गमावले. अखेर लक्षकेंद्रित करत सात्त्विक-चिरागने गुणांची कमाई करत दुसरा गेम आणि लढत जिंकली.आणखी एका स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारता आल्याने छान वाटते आहे. सिंगापूर स्पर्धेत आमच्यावर पहिल्याच फेरीत गारद होण्याची नामुष्की आली होती. त्यानंतर. या स्पर्धेत भाग घेताना, शंभर टक्के योगदान द्यायचे एवढेच मनात होते. जय, पराजय हा खेळाचा भागच असतो; पण सर्वोत्तम कामगिरीच केली नाही, या भावनेने सामन्यातून बाहेर पडायचे नव्हते.

## नीरज चोप्रा बनला लेफ्टनंट कर्नल!

### संरक्षणमंत्री आणि लष्करप्रमुखांनी प्रदान केली उपाधी

**नवी दिल्ली :** दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अलंकरण समारंभात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि लष्करप्रमुख उप्रेंद्र द्विवेदी यांच्या हस्ते त्यांना ही मानद पदवी प्रदान करण्यात आली. नीरज चोप्रा २६ ऑगस्ट २०१६ रोजी नायब सुभेदार या पदावर भारतीय सैन्यात भरती झाले होते. त्यानंतर, २०२१ मध्ये या खेळाडूला सुभेदार पदावर बढती मिळाली. तर २०२२ मध्ये निरजला सुभेदार मेजर पदावर बढती मिळाली होती.

नीरज हाऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांमध्ये भारतासाठी दोन वैयक्तिक पदके जिंकणाऱ्या निवडक खेळाडूंमध्ये समाविष्ट आहेत. ॲथलेटिक्समध्ये त्यांच्यापूर्वी नॉर्मन प्रिचर्ड यांनी दोन रौप्य पदके (पुरुषांची २०० मीटर आणि पुरुषांची २०० मीटर अडथळा शर्यत) जिंकली होती. कुस्तीमध्ये सुशील कुमारने एक रौप्य आणि एक कांस्यपदक पटकावले. बॅडमिंटनमध्ये पीव्ही सिंधूने एक रौप्य आणि एक कांस्यपदक आपल्या नावावर केले आहे, तर नेमबाजीमध्ये मनू भाकरने दोन कांस्यपदके जिंकली आहेत. टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून नीरजने इतिहास रचला होता. मात्र, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये त्याला आपल्या सुवर्ण यशाची पुनरावृत्ती करता आली नाही. असे असले तरी निरजने भारतात भालाफेक या खेळाला नवी ओळख मिळवून दिली आहे. जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपसह जगातील अनेक स्पर्धांमध्ये त्याने अव्वल स्थान मिळवले आहे. सध्या तो केवळ भारतातीलच नव्हे, तर जगातील अग्रगण्य भालाफेकपटूंमध्ये गणला जातो. परिणमे त्याच्या यशामुळेच भारतात या खेळाला लोकप्रियता मिळाली आहे.



### नीरजच्यापूर्वी 'या' खेळाडूंना मिळाला सन्मान

भारतीय लष्कराने नीरज चोप्रा याला प्रादेशिक सेनेत (ढशीीळीेंळरश्र अीू) 'लेफ्टनंट कर्नल' या पदाची मानद उपाधी दिली आहे. नीरज याच्यापूर्वी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनी आणि कपिल देव तसेच ऑलिम्पिक सुवर्ण पदक विजेता अभिनव बिंद्रा यांसारख्या खेळाडूंना प्रादेशिक सेनेत मानद उपाधी देण्यात आली आहे. प्रादेशिक सेना भारतीय लष्कराचे राखीव दल आहे. यामध्ये सामील करण्यात येणा-या दिग्गजांना दरवर्षी काही दिवसांचे लष्करी प्रशिक्षण दिले जाते, जेणेकरून गरज पडल्यास देशाच्या रक्षणासाठी त्यांची सेवा घेता यावी.

## टी २० मध्ये होणार किंग बाबर आझमचे पुनरागमन!

**इस्लामाबाद :** पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी १८ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. माजी कर्णधार आणि स्टार फलंदाज बाबर आझम या संघात परतला असून, मोहम्मद रिझवानसह हे अनुभवी खेळाडू शान मसूदच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरतील. बाबरच्या परत आल्यामुळे पाकिस्तानची मधली फळी अधिक बळकट झाली आहे. प्रमुख गोलंदाज शाहीन आफ्रिदी, हसन अली आणि अबरार अहमद या मालिकेत संघाचा भाग असतील, तर इमाम-उल-हक आणि अब्दुल्ला शफीक डावाची सुरुवात करतील. सौद शकील आणि सलमान अली आघा मधली फळी मजबूत करतील.

संघात अनुभवी खेळाडूंसोबत काही नवीन चेहऱ्यांनाही संधी देण्यात आली आहे. आसिफ आफ्रिदी, फैसल अक्रम आणि रोहेल नझीर या खेळाडू पदार्पण करणार आहेत. सर्व खेळाडू ८ ऑक्टोबरपर्यंत सराव शिबिरात सहभागी होतील, तर एसीसी पुरुष टी२० आशिया कपमधील खेळाडू ४ ऑक्टोबर रोजी शिबिरात सामील होतील. पहिला कसोटी सामना १२ ते १६ ऑक्टोबर दरम्यान लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमवर आणि दुसरा सामना २० ते २४ ऑक्टोबर दरम्यान रावळपिंडी क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. या मालिकेनंतर दोन्ही देश २८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान तीन सामन्यांची टी२० मालिका आणि ४ ते ८ ऑक्टोबर दरम्यान तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळतील.

पाकिस्तानचा संघ पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आला आहे: शान मसूद (कर्णधार), आमिर जमाल, अब्दुल्ला शफीक, अबरार अहमद, आसिफ आफ्रिदी, बाबर आझम, फैसल अक्रम, हसन अली, इमाम-उल-हक, कामरान गुलाम, खुर्रम शहजाद, मोहम्मद रिझवान (यष्टीरक्षक), नोमान अली खान, रोमान खान (विकेटकीपर), नमाज खान (विकेटकीपर), अली आगा, सौद शकील आणि शाहीन शाह आफ्रिदी.



दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुशांतच्या मृत्यू प्रकरणाची फाईल पुन्हा उघडणार?

**मुंबई :** अभिनेता सुशांत सिंग राजपूतच्या मृत्युप्रकरणाला आता तब्बल चार वर्षांहून अधिक काळ उलटला असला तरी या घटनेची चर्चा आजही सुरूच आहे. मात्र, या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (उइख) सादर केलेल्या क्लोजर रिपोर्टमधून एक मोठा खुलासा झाला आहे. सीबीआयच्या या रिपोर्टनुसार, अभिनेत्री रिया चक्रवर्तीने सुशांतला बेकायदेशीरपणे कोंडून ठेवले होते, धमकी दिली होती किंवा आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले होते, असे कोणतेही पुरावे सापडले नाहीत. तसेच रियाने सुशांतच्या मालमत्तेचा किंवा पैशांचा अपहार केला, हेही सिद्ध झालेले नाही.

रिपोर्टनुसार, राजपूत यांच्या कुटुंबाने आणि कायदेशीर टीमने सीबीआयच्या क्लोजर रिपोर्टला आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे. असे त्यांचे वकील वरुण सिंह यांच्याकडून माहिती समोर आलीय. वकील वरुण सिंह म्हणाले, 'हे केवळ डोळ्यांत धूळफेक करण्यासारखे आहे. जर सीबीआयला खरोखरच सत्य बाहेर यायचे असेल तर त्यांनी क्लोजर रिपोर्टसह अन्य रिपोर्ट, कागदपत्रे कोर्टात सादर केली असती, जी त्यांनी केली नाही. आम्ही या क्लोजर रिपोर्टविरुद्ध निषेध याचिका दाखल करू.' या वर्षी मार्चमध्ये दोन क्लोजर रिपोर्ट दाखल केले होते. एक, सुशांत सिंगचे वडील के के






सिंग यांनी पाटणा येथे दाखल केलेल्या खटल्यात, ज्यात रिया आणि तिच्या कुटुंबाने त्यांच्या मुलाला आत्महत्या करण्यास भाग पाडले आणि त्याच्या पैशाचा अपहार केला, असा आरोप केला होता. दुसरा, रियाने मुंबईत राजपूतच्याच्या बहिणींविरुद्ध दाखल केलेला खटला. सूत्रांच्या माहितीनुसार, तपासादरम्यान सीबीआयने सर्व आर्थिक व्यवहार, मोबाईल डेटा, चॅट्स आणि वैद्यकीय अहवालांची तपशीलवार चौकशी केली. मात्र त्यातून रियाविरुद्ध कोणताही गुन्हेगारी हेतू आढळला नाही. सुशांत आणि रियाचं नातं २०१९ पासून चर्चेत आलं होतं. दोघे काही काळ एकत्र राहत होते. सुशांतच्या मृत्यूनंतर रिया आणि तिच्या कुटुंबावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले. एनसीबी आणि ईडीनेही चौकशी केली होती. परंतु आता सीबीआयच्या निष्कर्षांनंतर रियावरील सर्व शंका जवळपास संपुष्टात आल्या

## कुटुंबीय कोर्टात देणार आव्हान..

आहेत. पण आता सिंग कुटूंब पुन्हा या प्रकरणाला आव्हान द्यायला तयार आहे. मीडिया रिपोर्टनुसार, मुख्य क्लोजर रिपोर्टमधील महत्त्वाची माहिती समोर आली आहे. रिया; तिचे पालक इंद्रजीत चक्रवर्ती आणि संध्या चक्रवर्ती; भाऊ शोविक; राजपूतची मॅनेजर श्रुती मोदी आणि हाऊस मॅनेजर सॅम्युअल मिरांडा यांच्यावरील आरोपांशी संबंधित ही माहिती आहे. रिया आणि तिचा भाऊ शोविक ८ जून रोजी घराबाहेर पडले होते आणि त्यानंतर ते घरी आले नाहीत. सुशांतने १० जून रोजी दुपारी २.४१ वाजता व्हॉट्सॲपद्वारे शोविकशी बातचीत केली होती. परंतु ८ जून ते १४ जून दरम्यान रियाशी कोणताही संवाद झाला नाही. सुशांतची रिया किंवा तिच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याशी इतर कोणत्याही प्रकारे संपर्कात असल्याचे पुरावे रेकॉर्डवर नाहीत. शिवाय, मीतू सिंग (सुशांतची बहीण) ८ जून ते १२ जून दरम्यान त्याच्या फ्लॅटमध्ये त्याच्यासोबत राहिली होती,' असे एका अधिकाऱ्याने क्लोजर रिपोर्टमध्ये म्हटले आहे.


---

# कॅनडामध्ये पंजाबी गायक तेजी कहलोवर हल्ला

**मुंबई :** कॅनडामध्ये पंजाबी गायक तेजी कहलोवर गोळीबार झाल्याचे वृत्त समोर आले आहे.गँगस्टर रोहित गोदाराच्या टोळीतील सदस्यांनी दावा केला आहे की, तेजी कहलोच्या पोटात गोळी लागली आहे. खूप आधी त्यांच्यात गँगवॉर सुरु होता, त्यातून हा गोळीबार झाल्याचे म्हटले जात आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, रोहित गोदाराच्या गँगशी संबंधित महेंद्र सरण दिलाना, राहुल रिनाऊ आणि विकी पहलवानने म्हटले आहे की, आम्ही यासाठी तेजीला गोळी मारली की, कारण तो आमच्या विरोधात ॲक्टिव्ह गँगला शस्त्रे पुरवत होता. गँगकडून जारी केलेल्या स्टेटम ेंटमध्ये म्हटलंय- आम्ही तेजी कहलोवर कॅनडामध्ये फायरिंग केली आहे. त्याच्या पोटात गोळी लागलीय. त्याने समजलं तर चांगली गोष्ट आहे. नाही तर असे जर घडले नाही तर पुढील वेळेस जीवे मारू.

रोहित गोदाराच्या गँगने पंजाबी गायकावर आरोप करत म्हले आहे की, तो आमच्या विरोधातील गँगना आर्थिक सपोर्ट करत होता. या शिवाय त्या



लोकांसाठी हेरगिरी करत होता. सध्या कॅनडाची तपास यंत्रणा या प्रकरणाचा तपास करत आहे.

तेजी कहलों कॅनडामध्ये राहणारा एक पंजाबी गायका आणि अभिनेता आहे. तो Punjabi diaspora संगीत क्षेत्रात ॲक्टिव्ह आहे. त्याच्या संगीतात पारंपरिक पंजाबी लोक वाद्ययंत्रे आणि लयीचे आधुनिक संगीताचे मिश्रण पाहायला मिळते. 'झूमर', 'मीठी जेल', 'टाईम चक दा', 'बापू तेरा पुत्त निकम्मा' यासारखी गाणी त्याच्या नावावर आहेत.

# कांतारा सिनेमाची रेकॉर्डतोड कमाई



**मुंबई :** ऋषभ शेट्टीचा चित्रपट 'कांतारा चॅप्टर १'ने दिन भी बॉक्स ऑफिसवर दम दार पकड बनवलीय. चित्रपटाने जगभरात ७०० कोटींचा आकडा पार केला आहे. 'कांतारा चॅप्टर १' चे बॉक्स ऑफिसवर जादू कायम आहे. २१ व्या दिवशीही प्रेक्षक कांताराकडे वळले आहेत. २०२५ चा हा ब्लॉकबस्टर चित्रपट 'छावा'चे लाईफटाईम रेकॉर्ड तोडण्यासाठी काही पाऊले दूर असल्याचे म्हटले जात आहे.

२०२५ च्या मेगा ब्लॉकबस्टर 'छावा'ने आपल्या लाईफटाईम रनमध्ये भारतात ६०१.५४ कोटींची कमाई केली होती. 'कांतारा चॅप्टर १' चा हा रेकॉर्ड तोडण्यासाठी आता जवळपास ५० कोटी आणखी कमवावे लागतील. ज चित्रपटाच्या कमाईची गती कायम राहिली तर पुढच्या आठवड्या अखेरीस नवं माईलस्टोन निर्माण होईल.

# 'मी भाजपाचा भक्त आहे'

**मुंबई :** ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक महेश कोठारे यांनी बोरिवलीत झालेल्या एका दिवाळी पहाट कार्यक्रमात केलेल्या वक्तव्यामुळे सध्या राजकीय आणि सांस्कृतिक वर्तुळात वाद निर्माण झाला आहे. कोठारे यांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं जाहीर कौतुक करताना मी भाजपाचा भक्त आहे आणि मोदीजींचा भक्त आहे, असं म्हटलं. त्यांच्या या विधानानंतर विरोधी पक्षातील नेत्यांकडून टीकेची झोड उठली आहे.

या प्रकरणावर शिवसेना (ठाकरे गट) नेत्या आणि मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. एका अपघात प्रकरणाचा संदर्भ देत त्यांनी कोठारेंवर अप्रत्यक्षपणे आरोप करताना म्हटलं, ङ्गते कलाकार आहेत हे खरं आहे, पण एका अपघात प्रकरणात त्यांची सून अडकली होती. तिला कसं वाचवायचं, तर अशी म ुक्ताफळं, सुमनं उधळल्याशिवाय काही होत नाही.ङ्ख

पुढे बोलताना पेडणेकर म्हणाल्या, ङ्गजी काही संस्कृती तयार होतेय, मी नाव घेणार नाही कारण कुठल्याही जातीचा अपमान करायचा नाही. पण छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून म



हाराष्ट्रात शौर्य आणि क्रौर्याची एक परंपरा आहे. वेळ आली की हेच कलाकार बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची आठवण काढतात. त्यामुळे कोठारे यांच्या वक्तव्याचा आम्ही निषेध करतो.ङ्ख

याआधी खासदार संजय राऊत यांनीही कोठारेंवर उपरोधिक टीका केली होती. ङ्गमहेश कोठारे नक्की मराठीच आहेत ना, याची मला शंका वाटते. तुम्ही कलाकार आहात आणि तुमचे चित्रपट फक्त भाजपच्या लोकांनी पाहिलेले नाहीत. तुम्ही असं काही बोलला असाल तर तुम्हाला 'तात्या विंचू' चावेल,ङ्ख असं राऊत म्हणाले होते. त्यांच्या या विधानानेही एकच खळबळ उडाली होती.महेश कोठारे यांच्या कौटुंबिक घडामोडींचा संदर्भ देत विरोधकांनी केलेल्या टीकेने राजकीय वातावरण तापलं आहे.

# ३५ व्या वर्षी अभिनेत्याचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू

**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेता गायक रिषभ टंडन याचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले आहे. निधनावेळी रिषभ दिल्लीमध्ये होता. घरच्यांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी तो दिल्लीला गेल्याचे समजते आहे.

रिषभला फकीर म्हणूनही ओळखले जात होते. रिषभच्या अशा अचानक जाण्याने त्याचे घरचे आणि मित्रमंडळीना धक्का बसला आहे. रिषभचे सोशल मिडियावर पाच लाखांहून आधीक फॉलोअर होते. रिषभच्या मित्रांनी त्याच्या मृत्यूची बातमी सोशल मिडियावर शेयर केली. रिषभ त्याच्या पाळीव प्राण्यावर असलेल्या प्रेमासाठीही ओळखला जात होता.

प्रसिद्ध पापाराझी विरल यांनी सोशल मिडियावर पोस्ट करत म्हणाले की, 'मनोरंजन जगतामधून एक दुखद गोष्ट समोर येत आहे. प्रसिद्ध गायक अभिनेता रिषभ टंडन याचे निधन झाले आहे. कुटुंबाला भेटण्यासाठी दिल्लीला गेलेल्या रिषभला तिथेच अटॅक आला.

रिषभ त्याच्या पाळीव श्वान आणि पत्नीसह मुंबई येथे रहात होता. करियर दरम्यान रिहाब वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत होता. अभिनेत्री सारा खान हिच्यासोबत त्याचे नाव जोडले जात होते. हे नाते लग्नापर्यंत गेल्याचा अनेकांचा अंदाज होता. पण साराने या अफवाच असल्याचे सांगितले. रिषभने त्यानंतर रशियन ओलेस्या नेडोबेगोवा हिच्याशी लग्न केले. एका प्रोजेक्ट दरम्यान त्याची आणि ओलेस्या ची भेट झाल्याचे त्याने सांगितले होते. रिषभच्या कुटुंबीयांनी यावेळी त्यांच्या प्रायवसीचा आदर केला जावा असे सांगितले आहे.



# शेळगाव आटोळ सर्कलमधील क्रांतिकारी चे सुनील मिसाळ बनले शेतकऱ्यांचा आवाज !

## अमोल मोरे यांचा महावितरण विभागाशी यशस्वी पाठपुरावा...!!

**जनसंचलन/बुलडाणा**

चिखली तालुक्यातील शेळगाव आटोळ सर्कलमधील आंचरवाडी आणि अमोना या गावामध्ये तब्बल (५) ट्रांसफार्मर बंद पडलेले होते शेतकऱ्यांचा रब्बी हंगाम सुरू झाला असून शेती पिकांना पाणी देणे गरजेचे आहे यातच ट्रान्सफॉर्मर बंद पडल्यामुळे शेतीचे कामे करणे शक्य होत नव्हते, म्हणून युवा शेतकरी नेते सुनील मिसाळ यांच्या पुढाकाराने तब्बल (५) ट्रांसफार्मर बसवण्यात आले आहे. शेतकरी गेल्या अनेक महिन्यापासून वीजपुरवठ्याच्या तीव्र समस्येला सामोरे जात होते रब्बी हंगाम सुरू होत असताना शेतकऱ्यांना विजेची गरज या काळामध्ये फार आवश्यक आहे. परंतु डीपी जळाल्याने ते शक्य होत नव्हते. वकऱ्यांनी,शेतकऱ्यांनी वारंवार वीज वितरण कंपनीकडे तक्रार दाखल केली परंतु शेतकऱ्यांच्या या समस्येला विलंब होत असताना या भागातील शेतकरी नेते सुनील मिसाळ यांच्या कानावर या सर्व समस्या मांडल्या त्यांनी तात्काळ बुलडाणा येथील शेतकरी नेते, रविकांत तुपकर यांचे कार्यालय गाठून, युवा नेते अमोल मोरे यांना सविस्तर सांगून आपण प्रामुख्याने आमच्या भागातील सर्व शेतकऱ्यांच्या




समस्या त्यामध्ये प्रामुख्याने सर्व जळालेले ट्रान्सफॉर्मर लवकरात लवकर बसवून देण्याची विनंती केली. अमोल मोरे यांनी महावितरण चे संबंधित इंजिनियर यांना अंचरवाडी आणि अमोना या दोन्ही ठिकाणचे बंद पडलेले ट्रान्सफॉर्मर तातडीने लक्ष घालून नवीन ट्रान्सफॉर्मर त्या ठिकाणी बसवण्यात यावे, अन्यथा शेतकरी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असा आंदोलनाचा इशारा दिला..! आंदोलनाचा इशारा देत वीज वितरण कंपनीचे इंजिनिअर यांनी तत्काळ आदेश देत शेळगाव आटोळ परिसरातील अंचरवाडी आणि अमोना या गावातील बंद पडलेले ट्रान्सफॉर्मर लवकरात बदलून दिले. वेळेवर ट्रांसफार्मर दिल्याने शेतकऱ्यांचा शेतकऱ्यांना नक्कीच याचा फायदा झाला पिकाचे रक्षण होणे सुलभ झाले युवा नेते सुनील मिसाळ यांच्या भूमिकेमुळे शेतकऱ्यांचा त्यांच्यावर विश्वास निर्माण झाल्याचे पहावयाला मिळाले. गावकऱ्यांनी क्रांतिकारी चे नेते अमोल मोरे आणि सुनील मिसाळ यांचे आभार मानले आणि म्हणाले की क्रांतिकारी शेतकरी संघटना आज प्रत्येक गावात आशेचा किरण बनली आहे विविध समस्येच्या बाबतीत तत्पर असून, शेतकऱ्यांच्या सन्मानासाठी आणि हक्कासाठी लढणारी आक्रमक संघटना म्हणून पुढे येत आहे. अंचरवाडी येथे नवीन ट्रांसफार्मर बसवितांना सुनील मिसाळ आणि अनेक शेतकरी त्या ठिकाणी उपस्थित होते..

# सापडलेला मोबाइल केला परत...

## शिवाज्ञा फाऊंडेशनचे सर्वेसर्वा अजय जाधव यांनी दिला प्रामाणिक पणा जिवंत असल्याचा पुरावा



**जनसंचलन/बुलढाणा**

सध्या दिवाळीचे दिवस आहेत. बाजारात, चौका चौकात विलक्षण गर्दी आहे. या गर्दीचा फायदा घेत चोर आणि भुरटे कधी कोणाचे दिवाळे काढतील सांगता येत नाही. कष्टाने आणि मेहनतीने कमीवलेल्या पैसे व वस्तुंना चोरटे भुरटे कधी गुल करतील सांगता येत नाही. परंतु बुलढाणा शहरातत आजही अनेक प्रामाणिक युवा असल्याचा प्रत्यय आज शिवाज्ञा मल्टिसर्व्हिसेस, व शिवाज्ञा फाऊंडेशनचे नांद्राकोळी येथील अजय जाधव यांच्या कृतीतून आला. कृषी उत्पन्न बाजार समिती समोर आज दुपारी १२.१५ च्या सुमारास वरच्या रस्त्याने चढताना अजय जाधव यांना ओप्पो कंपनीचा अंदाजित २३००० रु किंमतीचा मोबाईल सापडला. या वेळी अजय जाधव यांनी सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर वाघमारे यांची भेट घेऊन, मोबाईल वर आलेल्या कॉल च्या द्वारे मोबाईल मालकांची ओळख पटवत बुलढाणा शहर पोलीस स्टेशन चे ठाणेदार मा. रवी राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा मोबाईल मोबाईल धारकांस तुषार पवार यांना हा मोबाइल परत केला. या प्रामाणिक पणाचे कौतुक न करता प्रत्येकाने अडचणीत सापडलेल्या मदत करण्याचे आव्हान अजय जाधव यांनी केले आहे.

# दुचाकींवर ट्रिपल सीट,अपघाताचा धोका!

**जनसंचलन/ खामगाव**

वाहतूक नियमांची सर्रास पायमल्ली शहरात सातत्याने सुरू असून, विशेषतः दुचाकी वाहनांवर तिघांनी बसून प्रवास करण्याचे प्रकार वाढत आहेत. अशा प्रकारांमुळे अपघाताचा धोका वाढत असून, नागरिकांमध्ये वाहतुकीच्या शिस्तीविषयी उदासीनता दिसून येत आहे. मोटार वाहन कायद्यानुसार, दुचाकीवर केवळ दोनच व्यक्तींना बसण्याची परवानगी आहे. याशिवाय चालक व मागील प्रवाशासाठी हेल्मेट अनिवार्य आहे. परंतु शहरात अनेक ठिकाणी या नियमांचे उल्लंघन होत असून, तिघांनी एकाच दुचाकीवर प्रवास करताना अनेकजण दिसतात.

# डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषध विक्रीवर निर्बंध...


## औषध प्रशासन विभागाची तपासणी मोहीम

**जनसंचलन/बुलढाणा**

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने कप सिरपसह इतर औषधांच्या बेकायदेशीर विक्रीवर निर्बंध आणण्यासाठी जिल्ह्यात तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधे विक्री करू नयेत, असे निर्देश जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांना देण्यात आले आहेत. अलीकडच्या काळात काही औषध विक्रेते डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने ही मोहीम राबविण्यात येत आहे. सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन प्रल्हाद घिरके यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिमेअंतर्गत २१ औषध विक्रेत्यांची तपासणी केली. त्यात १६ औषध



विक्रेत्यावर डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय कप सिरप विक्री केल्या प्रकरणी कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या आले आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही औषध घेऊ नये. तसेच औषध विक्रेत्यांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा संबंधितांविरुद्ध औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदानुसार कडक कारवाई करण्यात येईल, अशी माहिती सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन घिरके यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली आहे.



# आमदार संजय गायकवाड यांची हॅलो बुलढाणा सिटी न्यूज व दैं.जनसंचलन कार्यालयाला दिवाळी सदिच्छा भेट!



जनसंचलन/बुलढाणा
बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे ज्वलंत व सरळ बोलणारे आमदार संजय गायकवाड यांनी आज दिवाळीच्या शुभमुहूर्तावर ङ्गहॅलो बुलढाणाफ सिटी न्यूज व दै. जनसचलन मुख्य कार्यालयाला सदिच्छा भेट देत टीमचे मन:पूर्वक अभिनंदन केले. या भेटीदरम्यान त्यांनी सध्याच्या राजकीय घडामोडी, जिल्ह्यातील विकासकामे, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांपासून ते माध्यमांच्या जबाबदारीपर्यंत विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. आमदार गायकवाड यांनी ङ्गहॅलो बुलढाणाफच्या झपाट्याने वाढणाऱ्या लोकप्रियतेचं विशेष कौतुक करत म्हटलं की, हॅलो बुलढाणा हे केवळ एक न्यूज पोर्टल नाही, तर जनसामान्यांचा आवाज बनलं आहे. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक घटनेवर बारीक नजर ठेवत योग्य माहिती लोकांपर्यंत पोहोचवणं हे या पोर्टलचं खरे सामर्थ्य आहे. लाखो दर्शक असलेले ङ्गहॅलो बुलढाणाफ आज बुलढाणा जिल्ह्यातील सर्वाधिक पाहिलं जाणारं व विश्वासार्ह न्यूज पोर्टल म्हणून उदयास आलं आहे. बातम्यांची गती, सत्यता आणि निष्पक्षता यामुळे ङ्गहॅलो बुलढाणाफने अल्पावधीतच वाचकांच्या मनात स्थान निर्माण केलं आहे. दिवसभरातील प्रत्येक घडामोडीचे जलद, अचूक आणि प्रभावी कव्हरेज हे या पोर्टलचं वैशिष्ट्य ठरत आहे. आमदार गायकवाड यांनी भेटीच्या शेवटी ङ्गहॅलो बुलढाणाफच्या सर्व टीमला आगामी काळासाठी शुभेच्छा देत जनतेच्या हक्कासाठी लढणारी पत्रकारिता कायम राखण्याचा सल्ला दिला. त्यांच्या या सदिच्छा भेटीमुळे ङ्गहॅलो बुलढाणाफ परिवारात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# बुलढाण्याच्या सहकार जगतातील एक तेजस्वी नाव, राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी हॅलो बुलढाणा मुख्यालयात! टीमच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा



जनसंचलन/बुलढाणा
सहकाराच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्याचा मान, प्रतिष्ठा आणि कीर्ती सातत्याने वाढवत जिल्ह्याला नव्या उंचीवर नेणारे बुलढाणा अर्बन सहकारी पतसंस्थेचे संस्थापक, समाजसेवेचे अध्वर्यू मा. राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी यांनी सोमवारी हॅलो बुलढाणा या जिल्ह्यातील आघाडीच्या न्यूज पोर्टलच्या मुख्यालयाला भेट देऊन कार्याचा आढावा घेतला. या वेळी हॅलो बुलढाणाफ चे मुख्य संपादक जितेंद्र देवचंद कायस्थ यांनी भाईजींचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत केले. भेटी दरम्यान भाईजींनी सिटी न्यूज आणि हॅलो बुलढाणा व दैनिक जनसंचलन टीमच्या सातत्यपूर्ण यशस्वी वाटचालीचे कौतुक करत त्यांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. भाईजी म्हणाले, जितेंद्र कायस्थ आणि त्यांची टीम केवळ बातम्या देत नाही, तर बुलढाण्याचा आवाज संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवत आहे. हॅलो बुलढाणा ने अल्पावधीतच जी लोकाभिमुख पत्रकारिता घडवली, ती बुलढाण्याच्या इतिहासात क्रांतिकारक ठरली आहे.फ्र भाईजींनी पुढे बोलताना जितेंद्र कायस्थ यांना आपला मानसपुत्र असे संबोधत त्यांच्यावर स्नेहाचा वर्षाव केला. ङ्गही टीम पुढे नक्कीच महाराष्ट्रातील क्रमांक एकची डिजिटल न्यूज फोर्स बनेल,फ्र असा विश्वास व्यक्त करत त्यांनी कायस्थ आणि त्यांच्या संपूर्ण टीमला दीपावलीच्या मन:पूर्वक शुभेच्छाही दिल्या.यावेळी संचालक राजेंद्र कायस्थ, शुभम कायस्थ, यश कायस्थ, ओम कायस्थ,किशन कायस्थ टीम हॅलो बुलडाणा व संपुर्ण सिटी परिवार उपस्थित होते या भेटीमुळे संपूर्ण हॅलो बुलढाणा परिवारात नवचैतन्य संचारले असून, बुलढाण्याच्या सहकार आणि पत्रकारिता क्षेत्रातील दोन अग्रगण्य प्रवाहांचा हा स्नेहसंवाद प्रेरणादायी ठरला आहे.

# भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांची हॅलो बुलढाणा कार्यालयाला दिवाळी भेट



जनसंचलन/बुलढाणा
दिवाळीच्या शुभ प्रसंगी बुलढाण्यातील जनतेच्या मनात विशेष स्थान असलेले, भाजपा जिल्हाध्यक्ष व माजी आमदार विजयराज शिंदे यांनी आज ङ्गहॅलो बुलढाणाफ सिटी न्यूज व दै. जनसंचलन मुख्य कार्यालयाला भेट देऊन टीमशी संवाद साधला. त्यांच्या या भेटीने हॅलो बुलढाणा परिवाराला नवी उर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे. शिंदे यांनी हॅलो बुलढाणाफ वृत्त पोर्टलच्या झपाट्याने वाढणाऱ्या लोकप्रियतेबद्दल समाधान व्यक्त करत, टीमच्या निर्भय आणि जनतेच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या पत्रकारितेचे कौतुक केले. जनतेच्या आवाजाला प्रामाणिकपणे न्याय देणारे व्यासपीठ म्हणून ङ्गहॅलो बुलढाणाफ ने बुलढाण्याच्या जनतेच्या मनात आपली वेगळी छाप निर्माण केली आहे,फ्र अशी भावना त्यांनी व्यक्त केली. राजकारणातील आणि समाजकारणातील त्यांच्या दांडग्या अनुभवाचा दाखला देताना, त्यांनी पुन्हा एकदा आपल्या प्रसिद्ध घोषवाक्याची आठवण करून दिली ङ्गहात दाखवा, गाडी थांबवा!फ जनतेशी थेट संवाद साधण्याची ही त्यांची शैली आजही कायम असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शिंदे यांनी बुलढाणा शहराला भयमुक्त, भ्रष्टाचारमुक्त आणि नशामुक्त बनविण्याचा संकल्प सर्वांसमोर मांडला. आपण सारे एकत्र आलो, तर बुलढाणा परिवर्तनाचं प्रतीक बनेल. दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे उजेडाचा विजय आणि तोच उजेड आपण जनतेच्या जीवनात आणूया, असे आवाहन त्यांनी केले. भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या या प्रेरणादायी भेटीमुळे हॅलो बुलढाणा सिटी न्यूज व दै. जनसंचलन टीमला नव्या जोमाने कार्य करण्याची ऊर्जा मिळाली आहे.

# रगो. से. महाविद्यालयात काव्यवाचन स्पर्धा संपन्न...

जनसंचलन/ खामगाव
विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाद्वारे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे काव्य संमेलन घेण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्वच शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये १)सुमित गावंडे २)करण भारसाखळे ३) कीर्ती वाघ ४)श्रुतिका घोपे ५)वैष्णवी जवळकार ६)किरण दिवेकार ७)जोती खवले ८)वैशाली निकडे ९)रोशन बांगर १०)दीपाली वानखेडे ११)आरती निर्मल १२)जोती खवले आणि साक्षी आहिरकर १३) श्रावणी घुले आदी विद्यार्थ्यांनी आई-वडील, प्रियकर,प्रियसी, मराठी भाषा, वर्तमान राजकारण, समाजकारण इत्यादी विषयांवर काव्य सादर केले.मराठी विभाग विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे काव्यवाचन,निबंध लेखन, वक्तृत्व, संवाद लेखन इत्यादी स्तुत्य वांग्मयीन उपक्रम वेळोवेळी राबवतात. आणि विद्यार्थी त्यामध्ये मोठ्या संख्येने भाग घेतात. या काव्यवाचन स्पर्धेचे अध्यक्ष इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ. डी. टी. आढाऊ यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल त्यांचे खूप खूप कौतुक केले व विद्यार्थ्यांनी आपल्या मधील सुप्त कलागुणांना योग्य वेळी ओळखून चालना देण्यासाठी महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांचे सहकार्य घ्यावे. अशा प्रकारे संबोधित करून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना काव्यवाचन स्पर्धेचे नियम व काव्यवाचन स्पर्धेचे महत्व सांगितले.या काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षण राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. एम. टकले यांनी केले व आपल्या काही स्वरचित काव्यरचना सादर केल्या. या कार्यक्रमासाठी मंचावर मराठी विभागाचे प्रा. विक्रम मोरे प्रा. डॉ. एच. डी. अकोटकर, उर्दू विभाग प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख, इतिहास विभागाचे प्रा.प्रदीप बाणाईत, प्रा. वाघमारे. हे उपस्थित होते. या संपूर्ण




कार्यक्रमाचे संचालन सुमित गावंडे यांनी केले तर कु.जोती खवले हिने उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु. साक्षी अहिरकर, रोषण बांगर, क्रिपा धांदे, कारण भारसाखळे, आदि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८